


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६५५. वा | गुरूवार | दि. १८ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

## सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्याला मिळाले प्रचंड यश

## माजी भांडारपाल प्रकाश बोथे यांच्यावर कोसळली निलंबनाची तलवार...

# या भ्रष्टाचार प्रकरणात बोथे एकटेच दोषी कसे उर्वरित भ्रष्टाचाऱ्यांवर कधी होणार कारवाई?

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील अनागोंदी कारभार व बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचा सातत्याने भंडाफोड करणाऱ्या सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या लढ्याला अखेर प्रचंड असे यश प्राप्त झालेले आहे. सरकारी यंत्रणेत राहून भ्रष्टाचाराचे लोणी खाऊन-खाऊन बोके बनलेल्या अधिकाऱ्यांवर आता कारवाईचा बडगा उगारला जाऊ लागला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या भांडारङ्घ्ङ्घ विभागात कार्यरत असताना साहित्य व औषध भांडार खरेदीत प्रचंड भ्रष्टाचार करणाऱ्या माजी भांडारपाल प्रकाश बोथे यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे जिल्हा रुग्णालयातील इतर भ्रष्टाचाऱ्यांचे धाबे दणाणले असून, सगळीकडे सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्याचे मोठे कौतुक होत आहे. अकोला आरोग्य उपसंचालक तरंगतुषार वारे यांनी काढलेल्या एका आदेशानुसार बोथे यांना निलंबित करण्यात आले असून, निलंबन काळात

**पोस्टमार्टम ६२**

त्यांची बदली वाशिम येथील क्षयरोग कार्यालयात करण्यात आली आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या सोबतच बुलढाण्याचे लोकप्रिय आमदार संजुभाऊ गायकवाड यांनी यासंदर्भात थेट विधिमंडळात प्रश्न उपस्थित करून हा प्रश्न सरकार दरबारी मांडण्याचा प्रयत्न केला होता. बोथे हे अनेक वर्षे जिल्हा सामान्य रुग्णालयातील भांडार विभागात भांडारपाल म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात भांडार विभागाचा भंडारा झाला होता. त्यांच्या कार्यकाळात अनेक प्रकारची उपकरणे, औषधींची खरेदी करण्यात आली होती. मात्र, यातील बरेचसे साहित्य हे भांडार विभागात कधी पोहोचलेच नाही. अशी तक्रारकर्त्यांच्या तक्रारीत होते खरे तर या प्रकरणात केवळ प्रकाश बोथे यांच्या निलंबनावर

**बुलडाणा येथे जनता दरबार कार्यक्रमासाठी आलेले विरोधी पक्ष गट नेता आ.दानवे यांच्याशी बुलडाणा महसूल विभाग व आरोग्य विभाग करोडो रुपये भ्रष्टाचार नियमबाह्य कामे प्रकरणाची चर्चा होऊन त्यांनी सर्व पुरावे घेऊन येण्याचे दिले सिटी न्यूजला निमंत्रण**

भागणार नाही. कारण कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेल्या साहित्याला पाय कसे फुटले आणि हे साहित्य गेले कुठे, याचा उलगडा आजही गुलदस्त्यातच असून यांची सखोल चौकशी करूनच होईल. शिवाय या प्रकरणात आणखी कोणा-कोणाचे हात ओले झाले केले आहेत आणि कोणी-कोणी आपल्या तुंबड्या भरण्याचे काम केले आहे, त्याचाही उलगडा होणे गरजेचे आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन जिल्हा रुग्णालयासह स्त्री जिल्हा रुग्णालयात जो काही भ्रष्टाचार बोकाळला आहे, त्यासंदर्भात सातत्याने भंडाफोड करीत आहे. एव्हढेच नाही तर काही महिन्यांपूर्वी जेंव्हा जिल्हा




रुग्णालयातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी एक समिती आली होती, त्या समितीला सिटी न्यूज टीमने प्रत्यक्ष भेटून भ्रष्टाचरासंदर्भात माहिती देखील समितीच्या सदस्यांना देण्यात आली होती. त्यामुळे हा संपूर्ण भ्रष्टाचार उघडकीस करण्यासाठी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने मोठा लढा लढलेला आहे.

उर्वरित पान ८ वर..




# शेगाव शहरात विवाहित महिलाचा त्याने केला पाठलाग करून विनयभंग

**जनसंचलन/शेगाव**

एकाने विवाहितेचा पाठलाग करून विनयभंग केल्याची घटना शहरातील आठवडी बाजारात घडली. याबाबत शहर ठाण्यात १३ जानेवारी रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. एका विवाहित महिलेने याबाबत शहर ठाण्यात तक्रार दिली. त्यामध्ये ९ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता ती आठवडी बाजारात आली होती. त्यावेळी आरोपी साहेबराव देवराव दाभाडे (रा. पाडसूळ, ता. शेगाव) याने वाईट उद्देशाने पाठलाग केला. विनयभंग करत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच महिलेचा मोबाइल हिसकावून घेऊन गेला. ही घटना घडल्याने फिर्यादी महिला घाबरून गेली. त्यानंतर तिने १३ जानेवारी रोजी पतीसोबत शहर




ठाण्यात येऊन तक्रार दिली. तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जनाधिकार जनता दरबार कार्यक्रम सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारा विरोधी पक्षनेते-अंबादास दानवे यांची टीका...

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या जनता दरबारास उदंड प्रतिसाद जिल्हा व शहरातील नागरिकांनी मांडल्या विविध समस्या

**जनसंचलन/बुलढाणा**

जनाधिकार जनता दरबार कार्यक्रम सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारा असल्याची टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती येथील शेतकरी भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा व शहरातील नागरिकांना या उपक्रमास उदंड प्रतिसाद दिला.जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थिती लावली. सकाळी १० वाजेपासून सुरू झालेला हा कार्यक्रम दुपारी ०२ वाजेपर्यंत चालला. यादरम्यान पीक विमा, प्रोत्साहन अनुदान व शेतकरी कर्जमाफी ह्या तक्रारी प्रामुख्याने आढळून आल्या. संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना अशा विविध योजनांच्या लाभाबाबतीत अडचणी नागरिकांनी अंबादास दानवे यांच्या समोर मांडल्या... स्वतः संबंधित अधिकार्यांना संपर्क करून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विविध तक्रारी मार्गी लावल्या.ज्या जागेवरून सोडविल्या जाऊ शकत नव्हत्या अशा प्रकरणाना मार्गी लावण्यासाठी पत्रे देऊन संबंधित विभागाला सुचना केल्या.. तसेच जिल्ह्यातील धरणातून होत असलेल्या अवैध वाळू उपसा विरोधात तहसीलदार यांना फोन करून तात्काळ हे बेकायदेशीर काम थांबवण्यात यावे आणि कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी, सुचना केली. २०१६ साली घरकुलासाठी अर्ज दाखल केला होता परंतु अद्याप पर्यंत लाभ मिळावा नसल्याचे एका तक्रारदाराने तक्रार केली.त्याविरोधात तात्काळ कार्यवाही करत





संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क करून हा प्रश्न मार्गी लावला. वित्तीय वर्षाच्या शेवटच्या म्हणजे ३१ मार्चपर्यंत घेतलेले कर्ज परत केले तर शासकीय कर्जमाफी व प्रोत्साहन अनुदानाचा लाभ मिळतो अशी राज्यातील शेतकर्यांची मानसिकता आहे.परंतु ज्या दिवशी शेतकरी कर्ज घेतो त्याच्या आदल्या दिवसापर्यंत कर्ज परत करावे लागते याची माहिती शेतकर्यांना नाहीच. त्यामुळे राज्यातील व बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी शासकीय लाभापासून वंचित राहतात



अशी माहिती एका शेतकर्याने दानवे यांच्या निर्दशनास आणून दिले. आपला विषय मला समजाला असून हा महत्वपूर्ण प्रकरण आगामी अधिवेशनात मी मांडतो तसेच तात्काळ स्वरुपात याचे निराकरण कसे करता येईल असे आश्वासन यावेळी त्यानी शेतकर्यांना दिले.. महिला,पुरुष,तरुण,तरुणी व वयस्कर अशा सर्व वयोगटातील नागरिकांनी याठिकाणी हजेरी लावून आपल्या तक्रारी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निर्दशनास आणून दिल्या.याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख नरुभाऊ खेडेकर, जिल्हाप्रमुख जालंधर बुधवत, वसंतराव भोजने, सुनील घाटे,महिला आघाडी जिल्हा संघटक जिजाबाई राठोड,तालुकाप्रमुख दीपक चांभारे, लखन गाडेकर,गोपालसिंह बच्छिरे, अशोक इंगळे,गणेश बोसरे,सुधाकर सुरडकर व संजीवनी वाघ उपस्थित होते..


# मराठा महिला अर्बन

**को-ओपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा**

पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

## पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com

तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क

सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)

मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.


## श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने जनुना येथे वृक्षारोपण...

**जनसंचलन/खामगाव**

स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने मागील २४ वर्षा पासून मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्ना भाऊ शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम अखंड निस्वार्थ पणे मुख मे हो राम नाम. राम सेवा हाथ मे हे ध्येय घेऊन अखंडपणे सुरू आहे आज दिं १७-१-२०२४ बुधवार रोजी दुपारी १२ वा जनुना तलाव येथील रेणुका माता संस्थान परिसरात शमीपत्र ची रोपे लावण्यात आली श्रावण महिन्यात शिव लिंगावर वाहिन्या करीता परीसरातील नागरिकांना शमी पत्र मिळावे म्हणून शमी ची रोपे लावण्यात आली या प्रसंगी माजी नगराध्यक्ष गणेश भाऊ माने,राज्य उत्पादन शुल्क चे नरेंद्र भाऊ मावळे, रमाकांत गलांडे, लायन्स क्लब चे किशोर गरड, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा,स्वप्नील शहा, विनोद सुकाळे, अरूण कडवकर,दिलीप झापर्डे,जयराज खेडकर, सुनील पाटील, नागोराव



अवचार, पुजारी कोळसे महाराज व भजनी मंडळाचे सर्व सदस्य व परीसरातील नागरिकांची उपस्थिती होती अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे वतीने देण्यात आली.

## पायी चालणाऱ्या महिलेचा ऑटोच्या धडकेत मृत्यू

**जनसंचलन/ शेगाव**

दवाखान्यातून पायी घरी जात असलेल्या महिलेला भरधाव ऑटोने धडक दिल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी खामगाव रोडवरील गुरुकृपा हॅटिलसमोर घडली. जगदंबा नगरात राहणाऱ्या अलकाबाई अरुण ढगे यांची प्रकृती बरी नसल्याने त्या खामगाव रोडवरील गजानन महाराज दवाखान्यात गेल्या होत्या. उपचारानंतर रस्त्याने पायी जात असताना मागून भरधाव वेगात आलेल्या ऑटो क्रमांक एमएच-२८, बीए-१०२६ ने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ढगे गंभीर जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना लगेच सईबाई मोटे रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून अलका ढगे यांना मृत घोषित केले. याप्रकरणी मृतकचा मुलगा अमोल ढगे याच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी ऑटोचालक अमोल विष्णु हुरपडे (रा.





पिंपळगाव काळे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यास अटक केली. शेगाव पोलिस पुढील तपास करीत आहेत. दुसरीकडे शेगावातील मार्गावरून वाहन चालक अस्ताव्यसस्थपणे वाहने चालवत आहेत. त्यातून येथे अपघाताच्या घटना वाढल्या आहेत.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देण्यासाठी कृषी महोत्सवाचे आयोजन : खासदार जाधव

## २५ जानेवारीला उदघाटन ; २७५ प्रदर्शनी, चाळीस बचत गटांचा सहभाग




**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र व राज्य शासन राबवित असलेल्या शेतकर्यांच्या विविध योजनांची माहिती तसेच पशुधन प्रदर्शनी नवनविन तंत्रज्ञानाद्वारे यांत्रिक शेती प्रयोगशील शेतकरी विकसित करण्यासोबतच सर्व सामान्य शेतकर्यांना योजनांची तसेच शेतकरी सन्मान योजना, पिक विमा योजना, जनधन योजना, नमो योजना कृषी तंज्ञांचे मार्गदर्शन शिवाय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन येत्या २५ ते २९ जानेवारी २०२४ पर्यंत मेहकर येथे कृषी महोत्सव प्रदर्शनीत होणार आहे. अशी माहिती यांनी पत्रकार परिषदेत दिली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात १६ जानेवारी रोजी सायंकाळी झालेल्या पत्रकार परिषदेला आ. संजय रायमूलकर, कृषी अधिक्षक मनोजकुमार ढगे, शिवसेना जिल्हा प्रमुख ओमसिंग राजपूत उपस्थित होते. खा. प्रतापराव जाधव यांनी सांगितले की, जिल्हास्तरीय कृषी महोत्सव मेहकर येथे होणार आहे. या कृषी महोत्सवात प्रदर्शनीचे २७५ स्टॉल तसेच बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री होण्यासाठी चाळीस स्टॉल याशिवाय पशुप्रदर्शनी गायी, म्हशी, शेळीपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. विविध विषयांवर कृषी तंज्ञाचे मार्गदर्शन प्रयोगशील शेतकरी यांनी उत्पादीत केलेल्या भाजीपाला फळे, कडधान्य यासह नवनविन तंत्रज्ञानाद्वारे यांत्रिक शेती अतिदुर्गम भागातील शेतकर्यांना माहिती मिळावी याशिवाय शेतकरी विमा योजना, शेतकरी सन्मान योजना, जनधन योजना, नमो योजना ज्या शेतकर्यांना योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यांना लाभ दिला जाणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातून मनोरंजन सुद्धा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या मेळाव्याचे उदघाटनाला पालकमंत्री दिलीप वळसे पाटील हे येणार असून तसेच प्रगतशील शेतकरी पुरस्कार प्राप्त शशिकांत पुंडलिक (शेगांव) यांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# दहिद बु. जिल्हा परिषद शाळेत राजमाता जिजाऊ यांचा जन्मोत्सव

**जनसंचलन/बुलडाणा**



दहिद बु. येथील जिल्हा परिषद सेमी इंग्रजी आयएसओ उच्च प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ जन्मोत्सव, युगपुरुष स्वामी विवेकानंद जयंती, तसेच मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद राजपूत अध्यक्षस्थानी होते. शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष नीता जैन, उच्च श्रेणी मुख्याध्यापक आत्माराम गायकवाड उपस्थित होते. दहिद बु. येथील शाळा जिल्हाभरात उपक्रमांची शाळा म्हणून परिचित आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जाते. राजमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त शाळेतील विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊची वेशभूषा धारण केली होती. मोहिनी जैन यांनी राजमातांचा जीवनपट सादर केला. तसेच विद्यार्थ्यांनी वकृत्व स्पर्धेत भाग घेतला. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जीवनपटावर भाषणे सादर केली. ऋत्विका राजपूत हिने तलवार बाजीचे प्रदर्शन केले. कार्यक्रमास तंटामुक्ती अध्यक्ष राजूभाऊ राजपूत उपस्थित होते. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानांतर्गत शाळेत माता-पालकांसाठी रांगोळी, तसेच घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली. राजेंद्र गवई यांनी सूत्रसंचालन केले. जयश्री जाधव यांनी आभार मानले. स्पर्धेसाठी सुनंदा गायकवाड, आशा खेत्रे, कावेरी जाधव, पल्लवी खरात, गणेश मुळे, जितेंद्र पालकर यांनी यांनी पुढाकार घेतला.

# शिवाजी महाराज जयंती, श्रीराम प्राणप्रतिष्ठा निमित्त आनंदाचा शिधावाटप




**जनसंचलन/बुलढाणा**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना सन २०२४ मधील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आनंदाचा शिधा वितरीत करण्यात येणार आहे. वितरीत करावयाच्या आनंदाचा शिधा संचात १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल व प्रत्येकी अर्धा किलो या परिमाणात चनाडाळ, रवा, मैदा व पोहा हे सहा शिधाजिन्नस समाविष्ट असलेला शिधाजिन्नस संच आनंदाचा शिधा प्रति शिधापत्रिका १ शिधाजिन्नस संच ई पॉस प्रणालीव्दारे शंभर रूपये प्रति संच या सवलतीच्या दराने वितरीत करण्यात येणार आहे. श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्ह्यातील ४ लाख ८१ हजार २७५ शिधापत्रिकाधारकांना १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल व प्रत्येकी अर्धा किलो या परिमाणात चनाडाळ, रवा, मैदा व पोहा हे सहा शिधाजिन्नस समाविष्ट असलेला शिधा जिन्नस संच ई पॉस प्रणालीद्वारे १०० रूपयांत वितरीत करण्यात येणार आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कळविले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांविना! विविध कामे अडली कायमस्वरुपी आरडीसी नेमण्याची सतीश पवार यांची मागणी...

**जनसंचलन/बुलढाणा**

तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी दिनेश गीते यांची बदली झाल्यानंतर गत काही महिन्यांपासून जिल्हाधिकारी कार्यालये निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांविना आहे. या प्रमुख पदाचा कारभार सध्या भूसंपादनचे उपजिल्हाधिकारी थोरात यांच्या खांद्यावर सोपवण्यात आला आहे. मात्र, त्यांच्याकडेही कामाचा वाढता व्याप पाहता आरडीसींचा कारभार सांभाळणे अवघड झाले आहे. परिणामी नागरिकांसह विविध प्रशासकीय कामांमध्येही आडकाठी निर्माण झाली आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी नियमित निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची शासनाने नेमणूक करावी, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह शासनस्तरावर निवेदन सादर केले आहे. निवासी उपजिल्हाधिकारी हे पद महत्त्वपूर्ण आहे. मात्र, हे मुख्य पदच गेल्या काही महिन्यांपासून रिक्त आहे. जिल्हाधिकारी विविध कामांमध्ये व्यस्त असतात. कधी मीटिंग, कधी व्हिडिओ कॉन्फरन्स, तर कधी जिल्हा दौरे देखील जिल्हाधिकाऱ्यांना करावे लागतात. ते कायम व्यस्त असतात. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाभरातून लोक विविध कामे घेऊन येतात. जिल्हाधिकाऱ्यांची भेट न झाल्यास निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदने, तक्रारी मांडाव्या लागतात. त्यामुळे शासन दरबारी विविध समस्या वेळेवर मांडता येतात व त्यांना न्याय मिळतो. वेळेवर योग्य तो न्याय देणे हे शासनाचे ध्येय आहे. परंतु बुलडाणा येथे निवासी जिल्हाधिकाऱ्यांचे पद रिक्त असल्याने विविध अडथळे येत आहेत. या पदाची निर्मिती ही लोकांना पूर्ण वेळ उपलब्ध राहण्यासाठी केलेली असते.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व तसेच जिल्ह्यातील प्रत्येक प्रशासकीय बाबीवर नियंत्रण करण्यास जिल्हाधिकाऱ्यांना सहकार्य करण्यासाठी हे पद महत्त्वपूर्ण आहे.



परंतु नियमित आरडीसी नसल्याने या पदाची महिमा कमी होत असल्याचे सतीश पवार यांनी म्हटले आहे. भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी थोरात यांच्याकडे हा प्रभार सोपवण्यात आला आहे. अगोदरच ते अन्य अतिरिक्त कारभार सांभाळत आहेत. लोकांना होणारा त्रास कमी व्हावा व जनसामान्यांना शासन दरबारी समस्या मांडणे सोपे व्हावे, यासाठी नियमित निवासी जिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक करावी, अशी मागणी सतीश पवार यांनी केली आहे.

# भारतीय समता संघटनेकडून जिल्हाधिकारी कार्यालय समोर गायरान जमिनीच्या विविध मागण्यांसाठी जेलभरो आंदोलन

## गायरान जमिनीसाठी निदर्शने अतिक्रमित पट्टे नियमित करण्याची मागणी





**जनसंचलन/बुलढाणा**

सरकारी गायरान जमिनींवर अतिक्रमणधारकांनी विविध मागण्यांसाठी भारतीय समता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आम्रपाल वाघमारे यांच्या नेतृत्वात १७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून जेल भरो आंदोलन करण्यात आले आहे. गायरान जमिनीचे अतिक्रमणधारकांना पट्टे वाटप करून ते नियमित करण्याची मागणी आंदोलकांनी केली. जिल्ह्यातील हजारो भूमिहीन लोकांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शेती केली आहे. त्यावरच त्यांच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालत आहे. राजस्व विभाग ही जमीन बरड असल्याचे सांगत आहे. गेल्या काही दशकांपासून आर्थिक व सामाजिकदृष्ट्या अप्रगत असलेले भूमिहीन या जमिनीवर आपली उपजीविका भागवत आहेत. आता सौरऊर्जेच्या नावाखाली भूमिहीनांच्या ताब्यातील ही अतिक्रमित जमीन उद्योगपतींना देण्याचा प्रयत्न होत आहे. या जमिनीवर सध्या पीक उभे आहे. परंतु महसूल विभागात त्यावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातून गैरसमज होत आहे. परिणामी, भूमिहीन लोकांना त्यांची कसलेले अतिक्रमित पट्टे नियमित करून देण्याची मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली. भूमिहिनांना त्यांनी अतिक्रमित केलेले पट्टे नियमानुकूल करून द्यावे, सौरऊर्जेसाठी जी जमीन अधिग्रहित करण्यात आली आहे, त्याऐवजी दुसरी जमीन देण्यात यावी. वन अधिनियमातील तरतुदीनुसार भूमिहीन लोकांना जमिनीचे स्थायी पट्टे देण्यात यावे, या प्रमुख मागण्या आंदोलकांच्या होत्या.यावेळी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे जिल्हा दौऱ्यावर आले असतांना त्यांनी या आंदोलनाला भेट दिली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय समोर शेकडो हजारांच्या संख्याने गायरान जमीनीच्या मागण्यासाठी लोक उपस्थितीत झाले होते.यावेळी भारतीय समता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आम्रपाल वाघमारे,संघटनेचे राष्ट्रीय सल्लागार अॅड शेषराव काळे,मयुर मोरे, राजेश बोर्डे सह आदी लोक मोठ्या संख्याने उपस्थितीत होते.

# पान १ वरून सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या भ्रष्टाचारविरोधी...

बोथे यांच्या निलंबनासंदर्भात निघालेल्या आदेशात म्हटले आहे की, बोथे यांनी विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केलेला आहे. जसे पाईपलाईनचे काम, कार्यालयीन फर्निचर, कुलर्स, इलेक्ट्रिक मोटर इत्यादींची खरेदी, छपाई कार्य, बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट, सिस्टीम खरेदी, व्हेंटिलेटर खरेदी, ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, स्प्रे खरेदी, मोबाईल एक्सरे युनिटची खरेदी, डायलिसीस मशीनची खरेदी, नियमप्रमाणे हाफकिनच्या बायो फार्मास्युटिकल्सकडून खरेदी न करणे, विहित रकमेचे मुद्रांक शुल्क भरून विविध करारनामे न करणे, विविध प्रकारच्या खरेदीसंदर्भात फाईल व कागदपत्रे अपूर्ण ठेवणे, जडसंग्रह नोंदवहीमध्ये योग्य त्या नोंदी न घेणे, भांडाराची नियमप्रमाणे सहा महिन्यातून एकदा पडताळणी न करणे, असे विविध प्रकारचे ठपके बोथेंच्या कामकाजावर ठेवण्यात आलेले आहेत. एवढं शिजत होत तेव्हा त्या वेळेसचे जिल्हा शल्यचिकित्सक काय माश्या पकडत होते का असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे जेंव्हा जिल्हा सामान्य रुणालयाच्या भांडार विभागाचे लेखापरिक्षण झाले, तेंव्हा बोथे यांनी भांडार विभागाच्या कामकाजासंदर्भात योग्य दस्तऐवज सादरच केले नव्हते. कारण काहीही करून त्यांना त्यांचा भ्रष्टाचार लपवायचा होता, हे आता स्पष्ट झालेले आहे. भांडार विभागातील भ्रष्टाचारासंदर्भात बोथे यांच्यावर कारवाईचा बडगा तर उगारला गेला आहेच, परंतु या भ्रष्टाचारात केवळ बोथे हेच फक्त सामिल आहेत, असे कोणीही समजू नये. कारण या भ्रष्टाचारात आणखीही बडे-बडे मासे सखोल चौकशी झाल्यास गळाला लागण्याची दाट शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत जिल्हा रुणालयात येऊन गेलेल्या सर्वच जिल्हा शल्यचिकित्सक, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक या सर्वांची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे. जिल्हा रुणालयात आज भ्रष्टाचाऱ्यांचा प्रचंड बोलबाला आहे. त्यामुळे त्यातील सर्वांची चौकशी होऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित आहे. तसे झाल्यासच जिल्हा सामान्य रुणालयातून भ्रष्टाचाराचा संपूर्ण नायनाट होईल आणि सर्वसामान्यांच्या चांगल्या आरोग्याचे ब्रीद घेऊन कार्यरत असणारे जिल्हा रुणालय खऱ्या अर्थाने जनतेचे असल्याचे सिद्ध होईल. जोपर्यंत ही सर्व प्रक्रिया पूर्ण होत नाही. तसेच जिल्हा रुणालयातील शेवटच्या भ्रष्टाचाऱ्यावर कारवाई होत नाही, तो पर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज काही केल्या आपला हा लढा थांबवणार नाही. भ्रष्टाचारविरोधातील या अंतहीन लढ्यासाठी दैनिक जनसंचलन वसिटी न्यूज सातत्याने कार्यरत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# खामगाव तालुक्यातील अटाळी व हिवरखेड येथील एल्गार परिवर्तन मेळाव्यांना मिळाला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद...

**जनसंचलन/खामगाव**

गेल्या काही महिन्यांपासून सोयाबीन-कापूस प्रश्नावर लढा उभारला आहे. शेतकरी विरोधी सरकारच्या विरोधात रविकांत तुपकर शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून लढत आहेत. केंद्र व राज्य सरकारला वारंवार वेळ देऊनही ते सोयाबीन कापूस बद्दल बोलायला तयार नसल्याने रविकांत तुपकर यांनी १९ जानेवारीला ङ्करेल्वे रोकोफ आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे त्यानुसार तुपकरांच्या नेतृत्वात १९ जानेवारिला रेल रोको आंदोलन होणार आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रविकांत तुपकरांनी केले आहे. दरम्यान रेल्वे रोको आंदोलन आणि येणारे लोकसभा या अनुषंगाने रविकांत तुपकर यांच्या ठिकठिकाणी होणाऱ्या परिवर्तन मेळाव्यांना शेतकरी शेतमजूर तरुण व सर्वसामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसून येत आहे. खामगाव तालुक्यातील अटाळी व हिवरखेड येथे झालेल्या ङ्कएल्गार परिवर्तनफ मेळाव्यांना परिसरातील गावकऱ्यांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. मिसाळवाडी येथे १३ जानेवारी रोजी शेतकरी, कष्टकरी, मजूर व तरुणांचा परिवर्तन एल्गार मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी या मेळाव्याला गर्दी केली होती. जेसीबीने पुष्पवृष्टी करून गावकऱ्यांनी तुपकरांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले तर लोकसभा निवडणुकीसाठी गावकऱ्यांच्या वतीने १ लक्ष रुपये लोकवर्गणीचा धनादेश तुपकरांना दिला. त्यानंतर खामगाव तालुक्यातील हिवरखेड व अटाळी परिसरातील गावकऱ्यांचा जोरदार व उत्स्फूर्त प्रतिसाद या परिवर्तन एल्गार मेळाव्याला मिळाला. परिसरातील तरुणांनी ताकदीने या मेळाव्यांचे नियोजन केले होते. शेतकरी व गावगाड्यातील सामान्य नागरिकांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. शेतमालाला भाव नाही, दुष्काळाची मदत नाही, पिकविमा नाही, नुकसान भरपाई नाही, फक्त घोषणांचा पाऊस अशी सरकारची अवस्था आहे. सध्याच्या सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. तरीही, सरकार सत्तेच्या धुंदीत मस्त आहे. त्यामुळेच गावगाड्यातील सामान्य शेतकरी पेटून उठला आहे. येणाऱ्या काळात सत्ताधारी नेत्यांच्या राजकीय वतनदारी उद्ध्वस्त केल्याशिवाय शेतकरी स्वस्थ बसणार नाही, असा इशारा रविकांत तुपकरांनी यावेळी दिला. यावेळी रवी महानकार, जिल्हा संपर्क प्रमुख श्याम अवथळे, वैभव हटकर, श्रीकृष्ण काकडे, दिपक देशमुख, महादेव पवार, गजानन वानखेडे, नानाभाऊ खटके, बबन खोडके, मोहन खेडकर, निलेश गवळी, गोपाल सुरडकर, ज्ञानेश्वर दांदडे यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958